जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


18 DEC 2023
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी (दि.१८) सकाळी ११.३० वाजता राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. अखिल भारतीय तंत्रज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे आहेत. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात होणाऱ्या दीक्षांत समारंभात साईसिमरन घाशीस राष्ट्रपती सुवर्णपदक तर बिल्कीस गवंडीस कुलपती सुवर्णपदक प्रदान केले जाईल. यंदा २१ हजार ९६३ मुलांना तर २७ हजार ४७५ मुलींना पदवी प्रमाणपत्राचे वाटप केले जाणार आहे.





रमेश बैस

- राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस अध्यक्षस्थानी
- अंखिल भारतीय तंत्रज्ञान परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे

**पोलिसांनी केले संचलन**

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या हस्ते होणार आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून रविवारी सकाळी पोलिसांनी संचलन केले आहे. राज्यपालांच्या सुरक्षेसाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. जवळपास शंभर पोलीस तैनात असणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ यशस्वी करण्यासाठी रविवारची सुट्टी रद्द करून प्रशासकीय कामकाज सुरू ठेवण्यात आले होते. रविवारी दिवसभर दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू होती. सकाळपासून पदवी प्रमाणपत्र वाटप केले जाणार आहे. विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वरूढ पुतळ्याजवळ फोटो काढण्यास विद्यार्थ्यांना परवानगी देण्यात आली आहे. राज्यपाल येणार असल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

18 DEC 2023
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### राज्यपाल रमेश बैस, डॉ. एस. एस. मंथा यांची प्रमुख उपस्थिती ; साईसिमरन घाशी, बिल्कीस गवंडी यांचा सन्मान होणार

# विद्यापीठाचा आज हीरकमहोत्सवी दीक्षान्त समारंभ

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी (६० वा) दीक्षान्त समारंभ उद्या, सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस, तर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत.

केंद्रीय पद्धतीने होणाऱ्या या समारंभात बत्तीस शिराळा (जि. सांगली) येथील साईसिमरन हिदायत घाशी हिला सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर मौजे आगार (जि. कोल्हापूर) मधील बिल्कीस हिदायत गवंडी हिला हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल कुलपती सुवर्णपदकाने सन्मानित केले जाणार आहे. यावर्षी एकूण ४९,४३८ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे.

दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरताना समक्ष असा विकल्प निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे विद्यापीठात दीक्षान्त समारंभादिवशी सकाळी साडेसात ते अकरा आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी सहावाजेपर्यंत वितरित केली जाणार आहेत. या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित केल्या जाणाऱ्या बूथचा क्रमांक एसएमएसद्वारे परीक्षा मंडळाकडून कळविला आहे.

## क्यूआर कोडने पदवी क्रमांक मिळणार



■ विद्यापीठाच्या आय. टी. सेलने पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी क्यूआर कोडची सुविधा दिली आहे. संबंधित क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर मिळणाऱ्या लिंकवर क्लिक करून स्वतःचा मोबाईल क्रमांक अथवा पीआरएन नंबर नोंदविल्यानंतर विद्यार्थ्याला त्याचा पदवी प्रमाणपत्राचा क्रमांक आणि बूथ क्रमांक मिळविता येणार आहे. विद्यापीठ परिसरात हे क्यूआर कोड ठिकठिकाणी लावले आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात उद्या (सोमवारी) होणाऱ्या दीक्षान्त मिरवणुकीसाठी स्वागत कमान उभारली आहे.

18 DEC 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## राज्यपाल रमेश बैस, मंत्री चंद्रकांत पाटील यांची उपस्थिती; ४९ हजार पदव्यांचे वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा हीरकमहोत्सवी दीक्षांत समारंभ आज (सोमवारी) सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे असणार आहेत. राज्यपाल रमेश बैस अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. दीक्षांत समारंभात ४९ हजार ४३८ पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत.

दीक्षांत समारंभात एम.ए. (मास. कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी (मूळ गाव बत्तीस शिराळा, जि. सांगली) हिला २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक तर जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूरची विद्यार्थिनी बिल्कीस गवंडी (मु.पो. आगर, ता. शिरोळ) हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

दरम्यान, रविवारी सायंकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी समारंभस्थळी जाऊन सर्व तयारीचा आढावा घेतला. संबंधित अधिकारी, समिती प्रमुखांना कार्यक्रम सुनियोजितरीत्या पार पडण्यासाठी सूचना केल्या.

पोलिस प्रशासनानेही संपूर्ण परिसराची बारकाईने तपासणी केली. दुपारपासूनच समारंभस्थळासह विद्यापीठ परिसरात चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात दीक्षांत समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे. (छाया : नाज ट्रेनर)**

### स्नातकांना पदवी वितरणासाठी ३३ बूथ

दीक्षांत मिरवणुकीसाठी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहापासून मुख्य इमारतीपर्यंत भव्य स्वागत कमान उभारली आहे. प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्रे स्वीकारणाऱ्या स्नातकांना पदवी वितरणासाठी परीक्षा भवन क्रमांक २ च्या प्रांगणात मंडप घालून ३३ बूथ उभारले आहेत. प्रत्येक बूथवर ३०० पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येईल. नोंदणीकृत स्नातकांना त्यांच्या पदवीच्या बूथविषयीची माहिती एसएमएसद्वारे कळविण्यात आली आहे. त्याखेरीज विद्यापीठ परिसरात सहा ठिकाणी क्यूआर कोडचीही व्यवस्था केली. ते स्कॅन करून स्नातकाने त्याचा मोबाईल क्रमांक अथवा पीआरएन क्रमांक टाकल्यानंतर त्याला त्याचा दीक्षांत क्रमांक तसेच बूथ क्रमांक समजणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 DEC 2023
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा आज ६० वा दीक्षान्त सोहळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभ सोमवारी होणार आहे. या सोहळ्यास ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्याची जय्यत तयारी विद्यापीठ प्रशासनाने केली आहे.

या दीक्षान्त समारंभात ४९,४३८ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये मुलींची संख्या २७,४७५ इतकी आहे. एकूण स्नातकांपैकी ९ हजार ६०५ जण प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत, तर ३९ हजार ८३३ जण पोस्टाद्वारे पदवी स्वीकारणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. (मास कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी (मूळ गाव बत्तीसशिराळा) हिला सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेजची विद्यार्थिनी बिल्कीस गवंडी (मु. पो. आगर, ता. शिरोळ) हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे. दरम्यान, सोमवारच्या सर्व परीक्षा स्थगित केल्या असून, कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ८.२० ते दुपारी ४ अशी केली आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त मुख्य इमारतीस करण्यात आलेली नेत्रदीपक विद्युत रोषणाई. (छाया : पांडुरंग पाटील)

# शहरात पोलीस बंदोबस्त

कोल्हापूर : प्रतिनिधी

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस सोमवारी (दि. १८) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यामुळे पोलिसांनी चोख बंदोबस्त नेमला आहे. शहरात ज्या ठिकाणी त्यांचे कार्यक्रम आहेत त्या रोडवरील काही एकेरी मार्ग थोड्या वेळासाठी शिथिल केले आहेत. कॅन्वाय गेल्यानंतर हे मार्ग पूर्ववत होतील. ज्या रोडने हा कॅन्वाय जाणार आहे, त्या रोडवर चौकाचौकात बंदोबस्त नेमला आहे.

कोल्हापूर विमानतळ ते अंबाबाई मंदिर, रोटरी क्लब ब्लड बँक ते स्वयम रेड क्रॉस स्कूल, शिवाजी विद्यापीठ, कंदलगाव ते पुन्हा विमानतळ या मार्गावरून राज्यपाल येणार आहेत. त्यांचा कॅन्वाय जाणाऱ्या मार्गावर वाहतूक पोलीस नेमले आहेत.

दुर्गा चौक ते खाँसाब पुतळा चौक हा वनवे मार्ग व्हीव्हीआयपी कॅन्वायमधील वाहनांसाठी शिथिल केला आहे. मिरजकर तिकटी ते बिनखांबी गणेश मंदिर मार्ग शिथिल केला आहे. ज्या रोडने कॅन्वाय जाणार आहे, त्या मार्गावरील वाहतूक काही वेळासाठी आवश्यकतेनुसार वळवण्यात येणार आहे.

## असा आहे बंदोबस्त

पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी राज्यपाल यांच्या दौऱ्यामुळे तगडा पोलीस बंदोबस्त नेमला आहे. विमानतळापासून या बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. यात अपर पोलीस अधीक्षक, शहर पोलीस उपअधीक्षक, करवीरचे उपअधीक्षक, पाच पोलीस निरीक्षक, २५ पोलीस उपनिरीक्षक, २५० पोलीस कर्मचारी, वाहतूक शाखेचे ५० पोलीस कर्मचारी, राज्य राखीव दलाची तुकडी, असा बंदोबस्त आहे.

जनसंपर्क कक्ष
18 DEC 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभाकरिता शिवाजी विद्यापीठ सज्ज

## राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली आज हिरकमहोत्सवी समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी दीक्षांत समारंभ सोमवारी (दि. १८) सकाळी साडेअकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस.एस. मंथा आणि प्रमुख अतिथी म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत. या समारंभासाठी शिवाजी विद्यापीठ सज्ज झाले आहे.



**शिवाजी विद्यापीठाच्या ६०व्या दीक्षांत समारंभासाठी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह सज्ज आहे.**

केंद्रीय पद्धतीने होणाऱ्या समारंभात बत्तीस शिराळा येथील साईसिमरन हिदायत घाशी हिला सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर मौजे आगर (जि. कोल्हापूर)च्या बिल्कीस हिदायत गवंडीला हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल कुलपती सुवर्णपदकाने सन्मानित केले जाणार आहे. ४९,४३८ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे, विद्यार्थिनींची संख्या २७,४७५ आहे.

रविवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आढावा घेतला. पोलिस प्रशासनाने परिसराची तपासणी केली. स्नातक व अन्य इच्छुकांनी एक तास आधी स्थानापन्न व्हावे, अशा सूचना दिल्या आहेत.

- दीक्षांत मिरवणुकीसाठी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहापासून मुख्य इमारतीपर्यंत स्वागत कमान.
- प्रमाणपत्रे स्वीकारणाऱ्यांसाठी परीक्षा भवन क्रमांक २च्या प्रांगणात ३३ बुथ.
- प्रत्येक बुथवर ३०० पदवी प्रमाणपत्रांचे वितरण.
- सहा ठिकाणी क्यूआर कोड स्कॅनची सोय. मोबाइल क्रमांक अथवा पीआरएन क्रमांक टाकल्यास दीक्षांत क्रमांक, बुथ क्रमांकही समजणार.

जनसंपर्क कक्ष
18 DEC 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची सुरुवात ज्या जुन्या ओपल हॉटेलच्या प्रांगणात झाली. त्याठिकाणी १९६४ मध्ये देशाचे तत्कालीन संरक्षणमंत्री आणि माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेला दीक्षान्त समारंभ हा पुढील अनेक वर्षे दिशादर्शक ठरला.



कोल्हापूर : आयोजनाचे स्वरूप, पोशाख आदी विविध बदल स्वीकारत पदवीचा उत्सव समजल्या जाणारा हा दीक्षान्त समारंभ व्यापक बनला आहे.

# उच्च शिक्षण वाढविणारा ‘दीक्षान्त’

## समारंभ व्यापक : पदवीधारकांचा वाढला टक्का : ६० वर्षांची गौरवशाली परंपरा

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : दक्षिण महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाचे दालन खुले करून देणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी दीक्षान्त समारंभ यंदा साजरा होत आहे. आयोजनाचे स्वरूप, पोशाख आदी विविध बदल स्वीकारत पदवीचा उत्सव समजल्या जाणारा हा समारंभ व्यापक बनला आहे. त्याच्याबरोबर तळागाळातील समाजातील उच्च शिक्षणाचा टक्काही वाढला आहे.

शिक्षण, मूल्यमापन, पायाभूत सुविधा, संशोधनवृत्ती, रोजगारनिर्मिती, पेटंट आणि त्याच्या व्यावसायिक उपयोजनांच्या अनुषंगाने पदवी; पदव्युत्तर शिक्षणाचे प्रयोजनातील बदल अंगीकारत विद्यापीठ वाटचाल करत आहे. या विद्यापीठाचा साठावा दीक्षांत समारंभ आज होत आहे.

विद्यापीठाची सुरुवात जुन्या ओपल हॉटेलच्या प्रांगणात झाली. त्या ठिकाणी १९६४ मध्ये देशाचे तत्कालीन संरक्षणमंत्री आणि माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेला दीक्षान्त समारंभ हा पुढील अनेक वर्षे दिशादर्शक ठरला. अशा समारंभाच्या आयोजनाची ती पहिलीच वेळ असल्याने मांडव, स्पीकर आदी व्यवस्था बाहेरगावच्या ठेकेदारांच्या माध्यमातून केली; पण कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी

> शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी पहिल्या दीक्षान्त समारंभाची दिशादर्शक सुरुवात केली. ती आजही मार्गदर्शक आहे. पदवीप्रदान करण्याचा उत्सव म्हणजे हा समारंभ आहे. ६० वर्षांतील विद्यापीठाची वाटचाल यशस्वीतेच्या दिशेने असल्याचे दीक्षान्त समारंभ दर्शवितो. खेड्यापाड्यातील मुलांना शिक्षित करण्याबरोबर मुलींच्या शिक्षणाचा टक्का वाढविणारा हा समारंभ आहे.
> **- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

पुढील सर्व समारंभात स्थानिक मंडप-डेकोरेटर्सच्या मदतीला सुमारे चार हजार लोकांची बैठक व्यवस्था होईल, अशा मंडपाची व्यवस्था केली. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून समारंभ अधिक नेटका केला जात आहे. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आता होत असलेल्या या समारंभाचे मूळ स्वरूप त्याची भव्यता ही पूर्वीप्रमाणे पारंपरिक अशी कायम आहे. पहिल्या दीक्षांत समारंभामध्ये १०९४ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान केल्या होत्या. पुढे वर्षागणिक वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर पदवी घेणाऱ्या स्नातकांची संख्या आणि त्यात मुलींचा टक्काही वाढला. यावर्षी एकूण ४९,४३८ स्नातक पदवी घेणार आहेत. त्यात मुलांची संख्या२१,९६३ इतकी, तर मुलींची संख्या २७, ४७५ अशी आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येतील ही वाढ विद्यापीठाची शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती दाखवून देत आहे.

### विद्यापीठ स्थापनेपासून पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण

| वर्ष | पदवी घेणारे एकूण विद्यार्थी | त्यातील विद्यार्थिनींची संख्या (कंसात टक्केवारी) |
|---|---|---|
| १९६४ | १०९४ | १९९ (१८.१९ टक्के) |
| १९७४ | १००५१ | १६६३ (१६.५५टक्के) |
| १९८४ | १२६२८ | ३२६८ (२५.८८टक्के) |
| १९९४ | २४९३५ | ७८१७ (३१.३५टक्के) |
| २०१८ | ५०४४४ | २६९३८ (५३.४०टक्के) |
| २०२२ | ६२३६० | ३२५२० (५२.१५टक्के) |
| २०२३ | ४९४३८ | २७४७५(५५.७८ टक्के) |

### २० व्या शतकातील शेवटचा समारंभ

विद्यापीठाचा ३६ वा दीक्षांत समारंभ हा २० व्या शतकातील शेवटचा पदवीदान समारंभ होता. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रमुख उपस्थितीत भाभा अणू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ चित्रकार अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना डी. लिट. ही मानद पदवी देऊन गौरविले होते.

### घरगुती सोहळ्याप्रमाणे तयारी चालायची

विद्यापीठाचा पदवीदान समारंभाची घरगुती सोहळ्याप्रमाणे तयारी चालायची. आधी दीड महिना पदवीधरांची यादी आणि प्रमाणपत्राच्या छपाईचे काम सुरू असायचे. सुंदर हस्ताक्षर असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून प्रमाणपत्रे लिहून घेतली जात होती. दीक्षान्त पोशाखाला इस्त्री करण्यापासून व्यासपीठावरील व्यवस्था विविध समित्यांच्या माध्यमातून केली जात होती. आता या समारंभाची भव्यता वाढली असली, तरी पारंपरिकता कायम असल्याचे विद्यापीठातील निवृत्त अभियंता रमेश पोवार यांनी सांगितले.

### पदवीधर होण्यातील मुलींचा टक्का वाढला

पहिल्या दीक्षान्त समारंभात पदवी स्वीकारणाऱ्या मुलींची संख्या १९९ होती. १९८४ मध्ये ३२६८ झाली. त्यानंतर पदवीधर होण्यातील मुलींची संख्या वर्षागणिक वाढत राहिली. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण १८ टक्के होते. आता हे प्रमाण ५५.७८ टक्क्यांपर्यंत पोहोचले असून त्यातून विद्यापीठ मुलींच्या शिक्षणाला देत असलेले पाठबळ दिसून येते.

### लता मंगेशकरांना डी. लिट. अन् समारंभाला गर्दी

विद्यापीठाने लता मंगेशकर यांना २१ नोव्हेंबर १९७८ रोजीच्या दीक्षान्त समारंभात डी. लिट. ही मानद पदवी प्रदान करून सन्मानित केले. तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे यांच्या हस्ते मंगेशकर यांना मानद पदवी प्रदान केली. बॅरिस्टर अप्पासाहेब पंत प्रमुख उपस्थित होते. या समारंभाला कोल्हापूरकरांची मोठी गर्दी झाली होती.

### प्रमाणपत्राचा आकार, दीक्षान्त पोशाख बदलला

पूर्वी देण्यात येणारे पदवी प्रमाणपत्र आकाराने मोठे होते. त्यामुळे ते सांभाळणे अडचणीचे ठरत होते. त्याचा विचार करून विद्यापीठाने १९९७ च्या दीक्षान्त समारंभापासून प्रमाणपत्राचा आकार लहान केला. पहिल्या समारंभापासून प्रमुख पाहुणे, स्नातक हे दीक्षान्त पोशाख (गाऊन) परिधान करायचे. मात्र, खादीचा प्रसार-प्रचार करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार चार वर्षांपासून दीक्षान्त पोशाख बदलला आहे. पांढऱ्या रंगाचे खादी सलवार कुर्ता अथवा जोधपुरी (पुरुषांसाठी) आणि पांढऱ्या अथवा मोती रंगाची खादीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोशाख सध्या आहे. दीक्षान्त पोशाखात मानवस्त्राचा समावेश झाला आहे.

18 DEC 2023

जनसंपर्क कक्ष

लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथमहोत्सवाला दोन दिवसांत शेकडो वाचकांनी दिली भेट

## वैचारिक ग्रंथांना मागणी : शिवाजी विद्यापीठात आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आमराई परिसरात सुरू असलेल्या ग्रंथमहोत्सवाला दोन दिवसांत शेकडो वाचकांनी भेट दिली. अनेक वैचारिक विषयांवरील ग्रंथांचीही विक्री झाली. यावेळी वेगळ्या विषयावरील ग्रंथांना मागणी होती हे सकारात्मक आहे, अशी प्रतिक्रिया ग्रंथविक्रेत्यांनी दिली.

विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या महोत्सवाला रविवारी प्रारंभ झाला. यात स्थानिक प्रकाशकांसह राज्यभरातील २२ प्रकाशक आणि ग्रंथ विक्रेते सहभागी झाले आहेत. त्यांच्या स्टॉलवर विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना खरेदीसाठी उपलब्ध आहेत. या महोत्सवाला दोन दिवसांत शेकडो ग्रंथप्रेमी तसेच वाचनवेड्या व्यक्तींनी भेट दिली.

याशिवाय दिव्यांगांनी बनविलेल्या वस्तूंच्या विक्रीचा हँडी हेल्प या संस्थेचा स्टॉल येथे आहे. तसेच अन्नपदार्थ विक्रीचे सात स्टॉल्स येथे आहेत. एम.बी.ए.अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचेही ३ तसेच स्टार्टअप उपक्रमास वाहिलेलेही काही स्टॉल आहेत.



शिवाजी विद्यापीठाच्या आमराई परिसरात सुरु असलेल्या ग्रंथमहोत्सवाच्या स्टॉलवरील ग्रंथांची डॉ. दिगंबर शिर्के यांनी पाहणी केली. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होत्या.

> ग्रंथमहोत्सवात वैचारिक पुस्तकांना मागणी असल्याचे चित्र दिसले. अनेकांनी आवर्जून आमच्या स्टॉलला भेट दिली. अनेक ग्रंथांची मागणी केली हे विशेष.
>
> - भाग्यश्री कासोटे-पाटील, भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023
पुण्यनगरी

# ग्रंथ महोत्सवास प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून 'ग्रंथ महोत्सव-डिसेंबर २०२३'चे आयोजन दि. १६ ते १८ डिसेंबरदरम्यान करण्यात आले आहे.

यामध्ये एकूण २२ प्रकाशक व ग्रंथ विक्रेते सहभागी झाले आहेत. त्याचबरोबर हँडीहेल्प या संस्थेने दिव्यांगांनी बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीचा स्टॉल मांडला आहे. या ठिकाणी अन्नपदार्थ विक्रीचे ७ स्टॉल आहेत. एम.बी.ए. अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचेही त्यात ३ स्टॉल आहेत. तसेच स्टार्टअप उपक्रमास वाहिलेलेही काही स्टॉल आहेत, त्यांना विद्यार्थ्यांतून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 DEC 2023
पुढारी

# ‘स्वररंगां’त रंगले शिवाजी विद्यापीठ

## संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमास प्रतिसाद

- दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथ महोत्सवात आयोजन
- मराठी, हिंदी चित्रपट गीतांचे सादरीकरण




कोल्हापूर : स्वररंग कार्यक्रमात सादरीकरण करताना संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी.

कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा

दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथमहोत्सवामध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वरंग सांगीतिक कार्यक्रमात अवघे शिवाजी विद्यापीठ रंगले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभानिमित्त संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी-मराठी चित्रपट गीतांसह सुफी, लोकधारा, लावणी व कव्वालींचे सादरीकरण केले. दोन तास चाललेल्या कार्यक्रमात पंधराहून अधिक गाणी सादर करून विद्यार्थ्यांनी सारे सभागृह मंत्रमुग्ध करून सोडले.

गायक सौरभ बुवा, ऋचा गावंदे, अनिकेत निर्मळे, प्रियांका मिरजकर, मयुरी जाधव व अन्य विद्यार्थ्यांसह प्रशांत देसाई (तबला), विक्रम परीट (ढोलकी), आकाश साळोखे (पियानो), मनोज जोशी (ऑक्टोपॅड) यांनी संगीतसाथ केली. श्रीधर जाधव यांनी साऊंड सिस्टीम सांभाळली.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगुले, उपकुलसचिव प्रिया देशमुख, लेखापाल वैशाली थोरात, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. विनोद ठाकूर-देसाई, डॉ. निखिल भगत, डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023
सकाळ

# विद्यापीठात रंगला 'स्वररंग'

## ग्रंथमहोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवामध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'स्वररंग' या सांगीतिक सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये अवघे विद्यापीठ रंगले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

विद्यार्थ्यांनी हिंदी-मराठी चित्रपट गीतांसह सुफी, लोकधारा, लावणी आणि कव्वालीचे अत्यंत बहारदार सादरीकरण केले. दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या या कार्यक्रमात पंधराहून अधिक गाणी विद्यार्थ्यांनी सादर करून सारे सभागृह मंत्रमुग्ध करून सोडले. गायक सौरभ बुवा, ऋचा गावंदे, अनिकेत निर्मळे, प्रियांका मिरजकर, मयुरी जाधव आणि अन्य विद्यार्थ्यांसह प्रशांत देसाई (तबला), विक्रम परीट (ढोलकी), आकाश साळोखे (पियानो), मनोज जोशी (ऑक्टोपॅड) यांनी संगीतसाथ केली. श्रीधर जाधव यांनी ध्वनी यंत्रणेची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील आदी उपस्थित होते.

### ग्रंथमहोत्सवास प्रतिसाद

या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवात विविध पुस्तके, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ आदींचे स्टॉल लागले आहेत. त्या ठिकाणी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि नागरिकांनी हजेरी लावली. उद्या सोमवारी रात्री नऊ वाजेपर्यंत ग्रंथमहोत्सव सुरू राहणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभातील ग्रंथमहोत्सवानिमित्त आयोजित 'स्वररंग' कार्यक्रमात रविवारी सादरीकरण करताना संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023
लोकमत

# यशवंतराव चव्हाणांपासून ५९ पाहुण्यांची उपस्थिती

## अब्दुल कलाम, मनमोहन सिंग यांचा समावेश

संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान सोहळ्यात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, शरद पवार, पी. व्ही. नरसिंहराव, डॉ. मनमोहन सिंग, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह डॉ. एपीजे अब्दुल कलाम, डॉ. कस्तुरीरंगन, डॉ. जयंत नारळीकर, आदी नामवंत, राजकीय नेते, अर्थतज्ज्ञ, राष्ट्रपती, राज्यपाल, न्यायाधीश, संशोधक, शास्त्रज्ञ यांनी हजेरी लावली आहे. यंदाही राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस अध्यक्ष म्हणून तर एआयसीटीईचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### आलेले प्रमुख पाहुणे...

यशवंतराव चव्हाण (१९६४ आणि १९७४), डॉ. पी. व्ही. पेरियन (१९६५), डॉ. सी. डी. देशमुख (१९६६), डॉ. डी. एस. कोठारी (१९६७), डॉ. पी. बी. गजेंद्रगडकर (१९६८), डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव (१९६९), वसंतराव नाईक (१९७०), मधुकरराव चौधरी (१९७०), जी. एन. वैद्य (१९७१), सुब्रमण्यम (१९७२), डॉ. व्ही. के. गोकाक (१९७५), डॉ. बी. डी. नागचौधरी (१९७६), डॉ. सतीशचंद्र (१९७७), बॅ. अप्पासाहेब पंत (१९७८), मोहम्मद हिदायतुल्ला (१९७९), डॉ. राजा रामन्ना (१९८१), ओ. पी. मेहरा (१९८२), शंकरराव चव्हाण (१९८३), न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी (१९८३), न्या. यशवंतराव चंद्रचूड (१९८५), पी. व्ही. नरसिंहराव (१९८६), न्या. पी. एन. भगवती (१९८६), सी. एन. राव (१९८७), न्या. विततोल मुखर्जी (१९८८), प्रा. राम ताकवले (१९९०), न्या. पी. बी. सावंत (१९९०), शरद पवार (१९९१), डॉ. श्री. वा. सोहोनी (१९९३), प्रो. जी. रामरेड्डी (१९९४), डॉ. मनमोहन सिंग (१९९४), न्या. व्ही. आर. कृष्ण अय्यर (१९९६), डॉ. राजगोपाल चिदंबरम (१९९७), डॉ. करणसिंग (१९९८), सोली सोराबजी (१९९९), डॉ. एपीजे अब्दुल कलाम (२०००), डॉ. चित्रा नाईक (२००१), डॉ. के. कस्तुरीरंगन (२००२), डॉ. अरुण निगवेकर (२००३), डॉ. विजय भटकर (२००४), प्रो. व्ही. एस. राममूर्ती (२००५), प्रा. एम. एम. शर्मा (२००६), प्रा. सईद इरानदोस्त (२००६), प्रा. सुखदेव थोरात (२००७), डॉ. स्नेहलता देशमुख (२००९), डॉ. नरेंद्र जाधव (२०१०), पृथ्वीराज चव्हाण (२०११), शैलेश नायक (२०१२), डॉ. योगिंदर प्रताप (२०१३), श्रीनिवास पाटील (२०१४), डॉ. जयंत नारळीकर (२०१५), डॉ. भूषण पटवर्धन (२०२०), डॉ. अनिल सहस्रबुद्धे (२०२१), पद्मश्री संजय धांडे (२०२२).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023 पुढारी

# वाचकाला त्याचेच पुस्तक मिळाले आठ वर्षांनी परत !

## शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथ महोत्सवास वाचकांचा प्रतिसाद




कोल्हापूर : दूरशिक्षण विभागातील प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांना त्यांचेच पुस्तक पुन्हा भेट देताना यशवंत बुक स्टॉलचे नेताजी कदम.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथ महोत्सवात एका वाचकाला त्याचेच पुस्तक आठ वर्षांनी परत मिळाल्याची दुर्मीळ घटना घडून आली. ग्रंथोत्सवास वाचकांचा प्रतिसाद लाभत आहे. दीक्षांत समारंभ मुख्य दिवशी विद्यार्थी, महाविद्यालयांचा पुस्तक खरेदीला अधिक प्रतिसाद लाभेल, अशी अपेक्षा आहे.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सहायक प्रा. डॉ. नितीन रणदिवे ग्रंथ महोत्सवात खरेदीसाठी पुस्तकांची पाहणी करीत होते. तेथे विविध पुस्तके पाहताना ज्येष्ठ विचारवंत आ. ह. साळुंखे यांचे 'सर्वोत्तम भूमिपुत्र : आक्षेप- डॉ. आंबेडकरांची विचारधारा आणि लेखकाची भूमिका' हे पुस्तक नजरेस पडले. ते त्यांनी कुतुहलाने हातात घेऊन पाहिल्यावर आश्चर्याचा धक्का बसला. त्यांच्या पत्नी विजया यांनी २०१५च्या व्हॅलेंटाईन डे ला त्यांना हे पुस्तक भेट दिले होते. त्यावर त्यांनी नितीन यांचे नाव लिहून स्वाक्षरी केली होती. त्यांच्याकडून कोणीतरी हे पुस्तक वाचण्यासाठी म्हणून घेऊन गेले होते, मात्र परत न करता रद्दीत घातले होते. तेच पुस्तक यशवंत बुक स्टॉलवर आठ वर्षांनी परत मिळाल्याचा आनंद डॉ. रणदिवे यांनी व्यक्त केला. अशा प्रकारे डॉ. रणदिवे यांना त्यांची व्हॅलेंटाईन गिफ्ट विद्यापीठाच्या ग्रंथमहोत्सवामुळे आठ वर्षांनी परत मिळाली.

18 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातून उद्योजकांची फौज तयार व्हायला हवी

## शिक्षणतज्ज्ञांकडून अपेक्षा व्यक्त : कौशल्याधारित अभ्यासक्रम स्वीकारला पाहिजे

**कोल्हापूर :** जगाचे अवकाश उद्योग, नवतंत्रज्ञानाने व्यापले आहे. या काळात पारंपरिक अभ्यासक्रमाला कवडीचीही किंमत राहणार नाही. पारंपरिक अभ्यासक्रमातून नोकरदारांच्या फौजा तयार करण्यापेक्षा कौशल्याधारित अभ्यासक्रम स्वीकारून उद्योजकांच्या पिढ्या तयार कराव्यात, अशी अपेक्षा शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली. दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणतज्ज्ञांची मते जाणून घेतली.

विद्यापीठांनी आता नोकरदारांच्या फौजा निर्माण करणारे अभ्यासक्रम सोडून कौशल्याधारित अभ्यासक्रमांना महत्त्व द्यायला हवे. समाजाच्या गरजा लक्षात घेऊन तसे अभ्यासक्रम तयार करणे गरजेचे आहे. नोकऱ्यांची संख्या कमी होत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त उद्योजक कसे तयार होतील, यादृष्टीने अभ्यासक्रम होणे आवश्यक आहे.

**-डॉ. सुनीलकुमार लवटे,**
शिक्षणतज्ज्ञ, ज्येष्ठ विचारवंत.

विद्यापीठाने त्याच त्याच विषयांवर संशोधन करण्यापेक्षा प्रगत संशोधनाची वाट निवडावी. नवनवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास करावा. तसे अभ्यासक्रम तयार करावेत. त्यासाठी विद्यार्थी, शिक्षकांना प्रोत्साहन द्यावे.

**- डॉ. आनंद पाटील,**
माजी इंग्रजी विभागप्रमुख,
गोवा विद्यापीठ.

मुळात जुना अभ्यासक्रम बदलून नवा आणणे याला बदल म्हणत नाहीत. विद्यार्थ्यांच्या हिताचे मॉडर्न अभ्यासक्रम आणणे गरजेचे आहे. वरून आलेल्या तयार अभ्यासक्रमांची खाली अंमलबजावणी करण्यापेक्षा विद्यापीठांना अभ्यासक्रम तयार करण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे. नव्या शैक्षणिक धोरणात ही अपेक्षा फोल ठरल्याचे दिसते.

**- डी. यू. पवार,** शिक्षणतज्ज्ञ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023
लोकमत

# विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेणे आवश्यक

## डॉ. एल. डी.कदम : चांगल्या सुविधा हव्यात


कॉलेज कॅम्पस

पोपट पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोराना काळातील ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे प्रचंड दुर्लक्ष झाले आहे. ते शरीराने वर्गात असले तरी मनाने मात्र ते इतरत्र भटकत असतात. फारसे वाचन नाही, अपडेट नसणे यामुळे ही पिढी गुणवत्तेत मागे राहण्याची भीती आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना पुन्हा रूळावर आणायचे असेल तर शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेऊन त्यांना पुन्हा अभ्यासाकडे वळविणे गरजेचे आहे, असे मत रयत शिक्षण संस्था संचालित राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. डी.कदम यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले.

केंद्र सरकारने आणलेले नवीन शैक्षणिक धोरण, त्याची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांची बदललेली मानसिकता याचा डॉ.कदम यांनी ऊहापोह केला. डॉ. कदम म्हणाले, कोरोनाच्या कालावधीत ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या काळातच विद्यार्थी सर्वाधिक आळशी बनले. अभ्यासाकडे दुर्लक्ष करू लागले. त्याचे परिणाम आता ठळकपणे दिसत आहेत. विद्यार्थी वर्गात असतो. पण त्याचे शिकवण्याकडे लक्ष नसते. ते वाचन करत नाहीत, ऐकण्याची क्षमताही कमी झाली आहे. विद्यार्थीच आपले स्वतःचे शैक्षणिक नुकसान करून घेत आहेत. अशावेळी शिक्षकांनीच प्रत्येक विद्यार्थ्यांची मानसिकता, त्याची बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन त्यांच्यात परिवर्तन करणे गरजेचे आहे.



### नवे धोरण उत्तम, पण भौतिक सुविधांची गरज

सरकारने आणलेले 'नवे शैक्षणिक धोरण २०२०' हे अतिशय उत्तम आहे. या धोरणामुळे कौशल्याधारित विद्यार्थ्यांची संख्या वाढणार आहे. त्यांच्या करिअरसाठी हे कोर्सेस उपयुक्त आहेत. पण, हे धोरण राबविण्यासाठी कॉलेजमध्ये भौतिक सुविधा किती आहेत याचीही गरज सरकारने ओळखणे गरजेचे असल्याकडे डॉ. कदम यांनी लक्ष वेधले. नव्या धोरणात मेजर आणि मायनर विषयांचा पर्याय विद्यार्थ्यांना आहे. पण यातील असंख्य प्रश्नाबाबत सरकारकडून कोणतीही स्पष्टता होत नसल्याचे डॉ. कदम म्हणाले.

### परिपूर्ण विद्यार्थी घडविण्याकडे लक्ष

शाहू कॉलेजमध्ये पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रमही सुरु करण्यात आले आहेत. स्पर्धेच्या युगात आपला विद्यार्थी कसा टिकेल या दृष्टिकोनातून सुविधा दिल्या आहेत. परिपूर्ण विद्यार्थी हेच आमच्या कॉलेजचे ध्येय आहे. पुढील वर्षी बीबीए, नर्सिंग हे कोर्स सुरु करणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना कॉलेजमधील प्रत्येक शिक्षक त्यात पारंगत असावा यासाठी त्यांना आतापासून प्रशिक्षित केले जात असल्याचे डॉ. कदम यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 DEC 2023
सकाळ

# विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे व्याख्यान

कोल्हापूर : आवश्यक माहिती संप्रेषण तंत्रज्ञान युग हे आंतरविरहित असल्याने शिक्षकांनी वैश्विक शिक्षकाची भूमिका काळाची गरज बनली असून, त्याकरिता आवश्यक कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सुहास पालेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे 'ग्लोबल एज्युकेशन अँड एज्युकेटर्स एक्स्प्लोरिंग करिअर्स दॅट होल्ड स्पेस' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी पालेकर बोलत होते. ते म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या युगात अनेक नवीन संधी शिक्षकांना उपलब्ध झालेल्या आहेत. त्याकरिता लागणारे कौशल्यही बदलले आहे. शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या अध्ययन-अध्यापन, मूल्यमापनात केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्राचा अवलंब करावा.'' अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनीही मनोगत व्यक्त केले. समन्वयक म्हणून डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी काम पाहिले. अविनाश भाले, किशोर खिलारे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. रूपाली संपकाळ यांनी आभार मानले.